
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# भारतीय स्त्री–शिक्षणातील आद्यक्रांतीकारक : महात्मा जोतिराव फुले

सचिन बजरंग जाधव
संशोधक विद्यार्थी , भूगोल विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**गोषवारा**

भारतीय समाजात पूर्वी विषमता, जातीभेद, उच्चनिचता यावर आधारलेली चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था होती. या समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी अनेक सामाजिक विचारवंतांनी विविध क्रांतीकारक चळवळी सुरु केल्या. त्यापैकीच एक म्हणजे महात्मा जोतिराव फुले यांनी सुरु केलेली 'स्त्री–शिक्षण' चळवळ होय. महात्मा जोतिराव फुले यांनी समाजपरिवर्तनाचे शस्त्र म्हणून प्रथम स्त्री शिक्षणास सुरुवात केली. स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी सुरू केलेल्या या कार्यात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. या शोधनिबंधाच्या माध्यमातून सदर चळवळीचा परामर्श घेतलेला आहे. प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा अवलंब केलेला आहे. तसेच या अभ्यासासाठी आवश्यक असणारी संपूर्ण माहिती दुय्यम स्त्रोतांव्दारे संकलित केलेली आहे. जुन्या चालीरितींना छेद देऊन स्त्रियांसाठी प्रथमच शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या महात्मा जोतिराव फुले या समाजक्रांतीकारकाच्या स्त्री–उध्दाराच्या कार्याचा आढावा सदर शोधनिबंधातून घेतलेला आहे.




**प्रस्तावना :**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. समाजातील सांस्कृतिक आणि सामाजिक विचारप्रवाहांना सुयोग्य वळण देण्याचे काम शिक्षणाचे आहे. मनुष्याची अस्मिता आणि अस्तित्व शाबूत ठेवून त्याला स्वावलंबनाने, स्वाभिमानाने आणि सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे. आज झपाट्याने बदलणाऱ्या जगामध्ये तर आपले अस्तित्व सिध्द करण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे.

जागतिक पातळीवर विचार करता १९ वे शतक हे सामाजिक, आर्थिक क्षेत्रात प्रचंड घडामोडींचे असलेले दिसून येते. भारताच्याही सामाजिक विकासाच्या दृष्टीने हे शतक अतिशय गतिशीलतेचे ठरावे असे अनेक विचारप्रवाह किंवा वैचारिक चळवळी विविध प्रांतात सुरू झालेल्या दिसून येतात. त्यापैकीच भारताच्या इतिहासात समाजप्रबोधनाची चळवळ म्हणून नोंद असलेली त्यावेळची एक नाविन्यपूर्ण आणि क्रांतीकारक चळवळ म्हणजे 'स्त्री–शिक्षण' चळवळ. या चळवळीचे किंवा विचारप्रवाहाचे जनक म्हणजे 'महात्मा जोतिराव फुले' होत. आज भारतामध्ये स्त्रियांच्या सबलीकरणासाठी विविध पातळयांवरती प्रयत्न केले जात असले तरी स्त्रियांच्या सबलीकरणाची सुरूवात महात्मा जोतिराव फुले यांच्यापासूनच झालेली दिसून येते.

शिक्षण हे सर्वांसाठी असते. ज्ञान संपादनाचे सर्व दरवाजे सर्वांसाठी खुले असले पाहिजेत, म्हणजेच शिक्षण घेण्याची क्षमता असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही कारणास्तव ज्ञानाचे दार बंद होता कामा

नये. कारण शिक्षण या मुलभूत हक्काची जर पायमल्ली झाली तर लोक अज्ञानी राहून समाजात विषमता, जातीभेद, अंधश्रदधा वाढते व समाजाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती खुंटते. अनादीकालापासून भारतातील बहुजन समान गुलामगिरीत, दुःखात खितपत पडला होता. बहुजन समाजाला या दयनीय अवस्थेतून मुक्त करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले यांनी क्रांतीकारी अशी शैक्षणिक चळवळ निर्माण केली. सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून या थोर विचारवंताच्या शैक्षणिक चळवळीचा परामर्श घेतला आहे.

### उद्दिष्टे :

१) स्त्रियांची तत्कालीन सामाजिक व शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.
२) महात्मा जोतिराव फुले यांचा स्त्रियांच्या स्थितीविषयी असलेला दृष्टीकोन अभ्यासणे.
३) महात्मा जोतिराव फुले यांच्या स्त्री-शिक्षणाविषयीच्या योगदानाचा अभ्यास करणे.
४) महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्री उध्दारासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

### व्याप्ती व मर्यादा :

सदर शोधनिबंधात स्त्रियांची असणारी तत्कालीन सामाजिक व शैक्षणिक स्थिती आणि स्त्रियांच्या उध्दारासाठी महात्मा जोतिराव फुले यांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास केलेला आहे.

### संशोधन पध्दती :

या विषयाच्या अभ्यासासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. अभ्यासासाठी आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दुय्यम स्त्रोतांव्दारे संकलित करण्यात आलेली आहे.

### विश्लेषण :

### तत्कालीन समाजिक स्थिती :

प्राचीन काळामध्ये भारतात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी चातुर्वर्ण्य समाज व्यवस्था अस्तित्वात होती. ही वर्णव्यवस्था उच्च-निचता, विषमता, जातीभेदावर आधारलेली होती. तथाकथित सवर्णांना जास्त अधिकार तर शुद्रांना मुळीच अधिकार नाहीत अशी स्थिती होती. तत्कालीन हिंदू समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या अन्यायामुळे व अत्याचारामुळे गुलामगिरीत राहून प्रतिगामी बनला होता. समाजात अनेक जुनाट, बुरसटलेल्या व अनिष्ट चालीरिती, रूढीपरंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड यांचे स्तोम माजले होते. शुद्रांना तर अतिशय हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. त्यांना गावकुसाबाहेर रहावे लागे, तथाकथित सवार्णांची सेवा करावी लागे. शुद्रांच्या स्पर्शाने किंवा सावलीनेसुध्दा सवर्णांना विटाळ होत असे. गाववस्तीत स्वतंत्रपणे फिरता येत नसे. त्यामुळे या वर्गातील जनतेची सामाजिक, आर्थिक व इतर सर्व क्षेत्रात अवनती होऊन, त्यांना अत्यंत कष्टप्रद, हालाखीचे व नरकयातनामय जीवन कंठावे लागत होते. या सर्वांचे कारण म्हणजे बहुजन समाजातील अज्ञान आणि शिक्षणचा अभाव होय.

### स्त्रियांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती :

हिंदू समाजातील शुद्रांसारखीच किंबहुना त्याहूनही अधिक पिळवणूक होत असलेला दुसरा घटक म्हणजे 'स्त्री' होय. हिंदू समाजात स्त्री विषयक अत्यंत क्रूर आणि अमानवी स्वरूपाच्या चालीरिती अस्तित्वात होत्या. उदा. बालविवाह, बहुपत्नीपध्दती, पडदा पध्दती, आजन्म वैधव्य, केशवपन, स्त्रियांची बालहत्या, शिक्षण बंदी अशा एकापेक्षा एक अमानुष प्रथांनी स्त्रियांची दशा गुलामाहूनही वाईट बनली होती. त्या काळात अस्पृश्य वर्गातीलच नव्हे तर स्पृश्य वर्गातील स्त्रियांनादेखील शिक्षण घेण्यास मनाई होती. कारण स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या बिघडतील, कुमार्गास लागतील, घरच्या सुखाचे वाटोळे होईल अशा चुकीच्या समजुती पसरवलेल्या होत्या.

## महात्मा जोतिराव फुले यांचे स्त्रियांच्या सामाजिक स्थितीविषयी विचार :

बहुजनांच्या आणि स्त्रियांच्या मागासलेपणाचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्यात असलेला विद्येचा किंवा शिक्षणाचा अभाव होय, हे म. फुले यांनी ओळखले होते. दीनदलितांच्या व स्त्रियांच्या पर्यायाने भारतीय समाजाच्या दैन्यावस्थेची कारणमीमांसा करताना ते लिहितात :

विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।।
वित्तविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका 'अविद्येने' केले।।

म्हणूनच बहुजनांना आणि स्त्रियांना गुलामगिरीतून, अन्यायातून, अत्याचारातून मुक्त करायचे असेल, त्यांना आपल्या अस्तित्वाची, स्वाभिमानाची जाणीव करून दयायची असेल, समाज परिवर्तन करावयाचे असेल तर त्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे 'शिक्षण' हे त्यांनी जाणले होते.

'शिक्षण म्हणजे विकासशील असा बदल', शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, सुसमृध्द, स्वाभिमानी, प्रगतशील बनतो. म्हणूनच भारतातील तथाकथित उच्च वर्णियांकडून बहुजनांना आणि स्त्रियांना जाणीवपूर्वक शिक्षणापासून दूर व अज्ञानात ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न झाला होता. कारण हा वर्ग जर शिकला तर आपली गुलामी, सेवा कोण करणार या दुष्ट विचाराने त्यांना बेभान केले होते. त्यामुळेच त्यांनी शिक्षण ही ब्राम्हणांखेरीज इतर जातींनी संपादन करण्याची गोष्ट नव्हे, असा गैरसमज पसरविला होता.

अज्ञान म्हणजे अंधःकार, शिक्षण म्हणजे तेजस्वी सुर्यप्रकाश. हा प्रकाश अज्ञानांध :कार नष्ट करून मनुष्याचे जीवन चैतन्यमय, प्रफुल्लित करून सोडतो. सर्वांगसुंदर जीवन जगण्याचे आणि विकसित करण्याचे 'शिक्षण' हे प्रमुख साधन आहे. शिक्षणाने मनुष्याला सत्यासत्यतेचा, चांगल्या-वाईटाचा, अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. कोणत्याही समाजात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्यक असते. म्हणूनच महात्मा जोतिराव फुले यांनी भारतीय समाजाला व स्त्रीला शिक्षित करण्याचा निर्धार केला.

## स्त्री-शिक्षणाची गरज :

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' या उक्तीप्रमाणे महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्री-शिक्षणाचे महत्व जाणले होते. त्यांच्या मते, पुरूषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची जास्त आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या वयाच्या दुसऱ्या, तिसऱ्या वर्षात जे वळण लावतात, त्यातच त्यांच्या विकासाची बीजे असतात. आपण जर एखादया पुरूषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे, परंतु एखादया स्त्रीला शिक्षण दिले तर ते संपूर्ण कुटुंबाला दिल्यासारखे आहे. स्त्रिया जर शिकल्या, तर मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन मातांकडून यशस्वी रीतीने होऊ शकते. स्त्री शिक्षण म्हणजे मुलांचा विकास, कुटुंबाचा विकास, पर्यायाने राष्ट्राचा विकास हे ओळखून त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाची गरज व्यक्त केली.

## स्त्री उध्दारसाठी केलेले कार्य :

महात्मा जोतिराव फुले यांनी शतकानुशतके पिचत पडलेल्या स्त्री व बहुजन वर्गाला सामाजिक व मानसिक गुलामगिरीच्या बेडयातून मुक्त करण्यासाठी विविध कार्य केले ते पुढीलप्रमाणे.

### अ) स्त्री-शिक्षण :

महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी केलेल्या कार्यातील सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे स्त्री-शिक्षण होय. समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न पुढीलप्रमाणे

**१) स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ :** महात्मा जोतिराव फुले यांनी १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पठेतील भिडयांच्या वाडयात मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अखिल भारतात खास मुलींच्या शिक्षणासाठी सुरू झालेली ही पहिली शाळा होय. भारतीय बहुजन समाजात स्वाभिमानाची ज्योत पेटली ती हीच वेळ. भारताच्या इतिहासात १८४८ हे वर्ष समाज परिवर्तनातील महान क्रांतीकारक वर्ष ठरले. अशा रीतीने त्यांनी आपल्या स्त्री उध्दाराच्या, दलितउध्दाराच्या आणि एकूणच समाज परिवर्तनाच्या कार्याचा श्रीगणेशा केला.

**२) धर्मपत्नीस शिक्षण :** महात्मा जोतिराव फुले यांनी मुलींची शाळा सुरू केली खरी, पण शाळेत शिकविण्यासाठी शिक्षक मिळेनात. तेव्हा जोतिरावांनी आपली धर्मपत्नी सौ.सावित्रीबाईंना प्रथम साक्षर केले. लेखन, वाचन, गणित यासारख्या मुख्य विषयांचा इयत्ता ७ वी पर्यंतचा अभ्यास पूर्ण करून घेतला आणि त्यांच्यावर शिकविण्याचे काम सोपविले. अशा रीतीने सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या स्त्री-शिक्षिका व मुख्याध्यापिका बनल्या.

**३) घराचा त्याग :** फुलेंना शाळा सुरू केल्यावर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परकीयांसोबत स्वकीयांचाही शिक्षण प्रसाराच्या कामी विरोध होता. काही नातलग, आप्तेष्ट, समाजातील लोक, तथाकथित सवर्ण यांनी महात्मा जोतिराव फुलेंच्या वडिलांना ःगोविंदरावाना भेटून संताप व्यक्त केला व वाळीत टाकण्याची भिती घातली. त्यामुळे वडिलांनी जोतिरावांना प्रखर विरोध केला व शाळा बंद करण्याचा निर्वाणीचा इशारा दिला. परंतु जे पाऊल टाकायचं ते आरंभी विचार करूनच, मग त्यात पुन्हा माघार घ्यायची नाही, हा त्यांचा बाणाच होता. शिक्षण प्रसाराचे आपले काम बंद पडू नये म्हणून त्यांनी आपले वडिलोपार्जित घर सोडले.

**४) शिक्षणाचा जागर :** बहुजनांच्या मुला मुलींसाठी शाळा काढल्या असल्या तरी ते आपल्या मुलां ःमुलींना शाळेत पाठवत नव्हते. जीवनाचा संपूर्ण कायापालट करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे, हे महात्मा जोतिराव फुलेनीं ओळखले होते. त्यामुळे ते बहुजनांच्या मनावर असलेल्या धार्मिकतेचा, अंधश्रध्देचा, अनिष्ट व बुरसटलेल्या चालीरिती, रूढी-परंपरांचा, अज्ञानाचा पडदा दूर करण्यासाठी त्यांच्यात मिसळून, वाडी-वस्त्यांवर जाऊन किंवा पालकाच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन वेगवेगळया दाखल्याद्वारे शिक्षणाचे महत्व पटवून देत. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये होणारा सद्गुणांचा, स्वाभिमानाचा विकास आणि अशिक्षितपणामुळे झालेले नुकसान, अडचणी, अन्याय इ. जाणीव करून देत. आपल्या मुलाच्या आणि कुटुंबाच्या विकासासाठी पाल्याला शिकवावे म्हणून ते पालकांना अत्यंत तळमळीने विनवण्या करत. अशाप्रकारे बहुजन समाजाचे मन परिवर्तन व शिक्षणाविषयी जागृती करण्यासाठी त्यांनी जणू जागरच मांडला होता.

**५) शिक्षणाचा प्रसार :** मुलींसाठी पहिली शाळा सुरू झाल्यावर हळुहळु शाळेत मुलींची संख्या वाढू लागली. मुलींची वाढती संख्या लक्षात घेऊन फुले यांनी पुण्यात आणखी दोन-तीन शाळा सुरू केल्या. सावित्रीबाईनींही मदतीसाठी ओळखीच्या बायका जमवून त्यांना योग्य मार्गदर्शन केले, त्यामुळे त्या शाळेतील मुलींना शिकवण्यास मदत करू लागल्या.

**६) शिक्षणासाठी सहाय्य :** महात्मा जोतिराव फुले यांनी मुलींच्या आणि बहुजनांच्या शिक्षणासाठी फक्त शाळाच काढल्या नाहीत, तर त्यांनी शिक्षण घ्यावे, शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून बरीचशी मदत देखील केली. शाळेतील अभ्यासासाठी त्यांना पाटया, पुस्तके आणि काही अति गरीब विद्यार्थ्यांना भोजन, शिष्यवृत्ती इ. स्वत ःच्या मिळकतीतून आणि इतरांकडून मिळालेल्या मदतीतून दिल्या.

**७) आर्थिक निधीची उभारणी :** स्त्रियांच्या व बहुजनांच्या उध्दारासाठी शाळा सुरू केल्या परंतु शाळा चालवायच्या म्हणजे आर्थिक निधीची गरज. आर्थिक कारणांमुळे शाळा बंद पडू नयेत म्हणून त्यांनी विविध मार्गांनी आर्थिक निधी उभारण्याचा प्रयत्न केला. म. फुले यांना घराचा त्याग करावा लागल्यामुळे वडिलांकडून मिळणारे अर्थसहाय्य थांबले होते. त्यामुळे त्यांनी रस्त्यांची, पुलांची, घरांची कंत्राटी कामे घ्यायला सुरूवात केली आणि त्यातून मिळणारे पैसे काटकसरीने घरखर्चास वापरून इतर पैसा शिक्षणप्रसाराच्या पवित्र कामासाठी वापरला. तसेच सरकारकडून देशी शिक्षण आणि वाड्.मय यांच्या उत्तेजनार्थ ठेवलेल्या सर्वसाधारण निधीतून शाळांना अर्थसहाय्य मिळावे म्हणून विनंती अर्ज केला होता. त्यानुसार दक्षिणा पारितोषिक समितीकडून दरमहा ७५ रू. अनुदान मिळू लागले आणि आणखी गरज भासल्यास वाढवून देण्याचे मान्य केले. तसेच बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, काही

सुधारणावादी, व्यापारी, हितचिंतक व मित्रपरिवार यांच्याकडूनही वेळोवेळी यथाशक्ती मदत मिळविण्याचा प्रयत्न केला.

**८) सरकारला कर्तव्याची जाणीव :** सर्व मुलामुलींना शिक्षण देणं हे काम खंर तर सरकारचं, पण सरकारने अजून हवे तेवढे याकडे लक्ष दिले नव्हते. त्यामुळे म. फुलेंनी स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी चालू केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या गौरव समारंभात केलेल्या भाषणामध्ये सरकारला आपली कर्तव्याची जाणीव करून देताना ते म्हणतात, *'निदान यापुढे तरी सरकारने शिक्षण प्रसाराकडे दुर्लक्ष करू नये व सर्वांना शिक्षणाचे पौष्टिक खाद्य पुरवून त्यांची मनं अधिक तेजस्वी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तरच पुढे देशाची काही प्रमाणात सुधारणा होऊ शकेल'.* पुढे काही काळानंतर या शाळा पुण्याच्या म्युनिसिपालटीने आपल्या ताब्यात घेतल्या व या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था अधिक प्रमाणात होऊ लागली. अशाप्रकारे सरकारला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणारे म. फुले हे खरे निर्भिड व्यक्तिमत्व होते.

**९) सरकारला इशारा :** शिक्षणाची प्रगती व सुधारणा करण्यासाठी ब्रिटीश सरकारने लॉर्ड मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सर्व मुलांना इंग्रजी व कॉलेजचे शिक्षण देण्याची योजना बनविली होती. या योजनेमागचा धुर्तपणा ओळखून मेकॉलेप्रणीत 'शिक्षण वरच्या वर्गातून झिरपत झिरपत खालच्या वर्गापर्यंत जावे' या सिध्दांतास विरोध करतानां महात्मा फुले म्हणतात, सरकारने खालच्या वर्गाला वर येण्याची प्रथम संधी द्यावी व नंतरच इतर सोयींचा अधिक विचार करावा यातच जनतेचे खरे हित असेल, असे सडेतोडपणे त्यांनी सरकारला ठणकावले. काही काळानंतर मेकॉलेच्या सुचनेवरून सरकारनं हंटरसाहेबांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीपुढेही त्यांनी आपले परखड विचार स्पष्ट केले.

डयुक व डचेस ऑफ कॅनॉट यांना पुण्यात दिलेल्या मेजवानीवेळीही जोतिरावांनी राजपुत्रांना उद्‌देशून सांगितले की, 'समारंभात आलेल्या व्यक्तींच्या मौल्यवान कपडयांकडे आणि चकाकणाऱ्या हिऱ्यांकडे पाहून तुम्हास असा भास होईल की, हिंदुस्थान देश मोठा सुखी नि समाधानी आहे. परंतु खेडयातील लोक निर्धन, भुकेकंगाल व बेघर असून अनवाणी चालतात. गरीब जनता दारीद्रयामध्ये पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे, हा आमचा निरोप महाराणी व्हिक्टोरियांना द्या'. अशा आपल्या सडेतोड वाणीने ब्रिटीशांच्या डोळयात झणझणीत अंजन घालण्याचे काम महात्मा जोतिराव फुले यांनी केले.

## ब) बालविवाहास विरोध :

पूर्वीच्या काळी मुला :मुलींचे विवाह लहान वयातच होत असत, अशा बालविवाहास महात्मा फुले विरोध करत. कारण असे लहान वयात विवाह झालेल्यांपैकी एखादा मुलगा तारूण्यात मरण पावला तर त्याच्या पत्नीवर आभाळ कोसळे आणि तिला उर्वरित आयुष्य अत्यंत हाल अपेष्टांचे, अपमानित, पराधिनतेचे, वैधव्याचे जगावे लागे. त्यामुळे ज्या वयात मुला :मुलींना स्वत :चे असे काहीच कळत नाही, अशा बालवयात विवाह करणं अयोग्य असल्याचे ते सर्वांना पटवून देत व बालविवाहापासून लोकांना परावृत्त करत. अशाप्रकारे बालविवाहास त्यांनी सामाजिक आणि आरोग्य विषयक अशा दोन्ही कारणांनी विरोध केला होता.

## क) विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन :

पूर्वीच्या काळी विधवेसंदर्भात अनेक अनिष्ट चालीरिती अस्तित्वात होत्या. विधवेने आपले उर्वरित आयुष्य ब्रम्हचर्यावस्थेत व्यतीत करावे आणि तिच्या सौंदर्याचा नाश करण्यासाठी केशवपन केले जाई. तसेच विधवेचे दर्शन अमंगल मानले जाई आणि बहिष्कृत असे जीवन कंठावे लागत असे. म्हणून महात्मा फुलेंनी हिंदु स्त्रीला अशा जुनाट बंधनातून मुक्त करण्यासाठी विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रीय पाठिंबा दिला होता. ८ मार्च १८६० रोजी त्यांनी शेणवी जातीच्या विधवेचा त्याच जातीच्या एका विधुराबरोबर पुनर्विवाह घडवून आणला होता. पुढे कालांतराने ही विधवा पुनर्विवाहाची चाल महाराष्ट्रात रूढ होत गेली.

### ड) बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना :

काही वेळा बऱ्याचशा तरूण अविवाहित मुलींचे अथवा विधवांचे चुकीचे पाऊल पडून त्या गरोदर होत. तसे झाले म्हणजे त्या किंवा त्यांचे नातलग लोक निंदेच्या भितीने गर्भनाश करत किंवा अर्भकास रात्री बेरात्री गल्ली :बोळात फेकून देत. अशा अभागी मुलींनी अथवा विधवांनी गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी एक बालहत्या प्रतिबंधकगृह १८६३ सालच्या सुमारास आपल्या घराशेजारी स्वखर्चाने बांधले. तसेच 'विधवांनी या गृहात गुप्तपणे बाळंत होऊन आपले मुल ठेऊन जावे.' अशा स्वरूपाच्या जाहीराती संपूर्ण पुणे शहरात भिंतीवर लावण्यात आल्या होत्या.

### इ) बहुपत्नीत्वाला विरोध :

एखादा पुरूष बालपणी विवाह झाला असल्यास पुढे कळू लागल्यानंतर जर त्याला बायको आवडत नसेल तर तो दुसरे लग्न करीत असे. तसेच काही लोभी पुरूष जास्त सुख मिळेल म्हणून दोन-तीन बायकांशी लग्न करीत असत. यामुळे स्त्रियांना बऱ्याचशा मानसिक यातना सहन कराव्या लागत. पुरूषांनी दोन-दोन बायकांशी लग्न करू नये म्हणून महात्मा फुले जनजागृती करत. तसेच त्यांनी स्वत :देखील मुल होत नसताना आणि आप्तेष्टांचा, नातलगांचा दबाव असतानासुध्दा दुसरा विवाह केला नाही. त्यामुळे 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे त्यांचे व्यक्तीमत्व असलेले दिसून येते.

### फ) सत्यशोधक समाजाची स्थापना :

महात्मा जोतिराव फुलेंचा स्त्रीदास्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय भिन्न होता. 'स्त्री-दास्य' हा हिंदूच्या पुरूषप्रधान संस्कृतीत विषमतेवर आधारलेल्या समाजरचनेचा परिपाक आहे. त्यामुळे जोपर्यंत या सामाजिक संरचनेत समतेवर आधारीत धर्मकल्पनेसहित क्रांतीकारक परिवर्तन होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्त्रियांची मुक्ती होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. धर्मपरिवर्तनाशिवाय समाजपरिवर्तन शक्य नाही, समाजपरिवर्तन करायचे असेल तर हिंदू धर्म पूर्णतःच टाकावा लागेल, या निष्कर्षापर्यंत फुले येऊन पोहचले होते. त्यामुळेच त्यांनी स्त्रियांच्या आणि विशेषतः संपूर्ण बहुजनांच्या उध्दारासाठी २३ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

### स्त्री उध्दार कार्यातील अडचणी :

महात्मा फुले यांनी समाज क्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून 'स्त्री-शिक्षण' हाती घेतले परंतु समाजपरिवर्तनाच्या या कार्यात त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते, त्यातील काही निवडक समस्या पुढीलप्रमाणे.

### १) जुन्या चालीरिती, रूढी व परंपरा :

तत्कालीन भारतीय समाजावर अनेक जुनाट, बुरसटलेल्या व अनिष्ठ चालीरिती, रूढी-परंपरा, प्रथा यांचा पगडा होता. त्यामुळे तो कोणताही नवीन बदल स्वीकारायला सहजा-सहजी तयार होत नसे. त्यामुळे महात्मा फुलेंना स्त्री-शिक्षणाचा प्रसार करताना अनेक अडचणींना व विरोधाला तोंड द्यावे लागले होते.

### २) स्त्री-शिक्षणाविषयीचा गैरसमज :

स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या काळातील लोकांना मोठा भ्रष्टाचार वाटे. स्त्रीने शिक्षण घेतले तर ती कुमार्गास लागेल, घराचे सर्वस्वी वाटोळे होईल, तिला वैधव्य येईल अशा चुकीच्या समजुती होत्या.

### ३) उच्चवर्णियांचा शिक्षणास विरोध :

शिक्षण ही तथाकथित उच्चवर्णियांखेरीज इतर जातींनी संपादन करावयाची गोष्ट नव्हे अशी त्याकाळी समजूत होती. त्यामुळे महात्मा फुलेंनी स्त्रियांसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केलेल्या पाहून तथाकथित उच्चवर्णियांच्यात संतापाची लाट उसळली. कारण 'स्त्री' व 'शुद्र' हे उभय वर्ग अपवित्र आहेत, त्यांना विद्या शिकविणे व शिकणे हे त्यांच्या दृष्टीने अघोर पाप, हिंदू धर्मावर भयंकर अत्याचार होय.

म्हणून म. फुलेंनीं सुरू केलेल्या शिक्षण प्रसाराच्या पवित्र कार्यास सर्वात जास्त तथाकथित उच्च वर्णियाकडूनच विरोध झाला होता.

**४) शिक्षिकांची कमतरता :**

महात्मा फुलेंनी शाळा सुरू केल्यानंतर मुलींना शिकवण्यासाठी शिक्षिका मिळत नव्हत्या. कारण त्या काळात अस्पृश्यांना तर शिक्षण दिले जात नव्हतेच परंतु वरिष्ठ वर्गातील काही दोन-चार मुली शिकल्या असल्या तरी त्यांच्या मनात अस्पृश्यांविषयी असलेल्या भावनेमुळे त्या शिकवायला येत नसत. काही पुरोगामी विचारांच्या महिला शिकवायला यायच्या म्हटल्या तर त्यांना समाजाकडून वाळीत टाकण्याची भिती होती. यामुळे शिक्षिकांची कमतरता ही मोठी समस्या फुलेंच्या पुढे होती.

**५) विद्यार्थीनींची अनुपस्थिती :**

सुरूवातीला या शाळेत सात ते आठ मुलीच येत होत्या. ज्या समाजातील मुलींसाठी ही शाळा सुरू केली त्या समाजातील पालकच आपल्या मुलींना शाळेत पाठवत नसत. कारण त्यांच्या मनावर धार्मिकतेचा, अंधश्रध्देचा, अज्ञानाचा असलेला पगडा आणि उच्च वर्णियांच्या अत्याचाराची, अन्यायाची असलेली भिती होय.

**६) समाजकंटकाडून छळ :**

तथाकथित उच्चवर्णिय फक्त विरोध करूनच थांबले नाहीत तर त्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना त्रास देखील दिला. महात्मा फुले त्यांचे समाजकार्य थांबवत नाहीत म्हणून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला सुध्दा केला होता, परंतु सुदैवाने त्यातून ते बचावले. सावित्रीबाई फुलेनांही रस्त्याने येता-जाता काही टारगट मंडळी दगड मारीत, अंगावर चिखल, शेण टाकत, टिंगल-टवाळी करत. परंतु दोघेही मनाने अतिशय खंबीर असल्याने त्यांनी आपले समाजकार्य चालूच ठेवले.

**७) समाजाकडून विरोध :**

महात्मा फुले यांना सामाजिक कार्यास तथाकथित उच्च वर्णियांकडून विरोध होत होताच परंतु ज्यांच्यासाठी त्यांनी हे कार्य सुरू केले होते, त्या समाजाकडूनही विरोध व छळ होत होता. वरिष्ठ वर्गाच्या चिथावणीला भडकून हे अज्ञानी, धर्मभोळे लोक त्यांना समाजातून बाहेर काढण्याची, वाळीत टाकण्याची धमकी देऊन विरोध करत.

**८) स्वकीयांकडून उपहास :**

समाजकंटकाकडून त्रास देऊन, छळ करून देखील महात्मा फुले डगमगले नाहीत म्हणून तथाकथित उच्चवर्णियांनी त्यांचे वडील-गोविंदराव यांना आपल्या मुलाविरूध्द भडकाविले. तुमच्या कुळाची अब्रु जाण्याची, सुन बिघडण्याची, धर्म बुडून बेचाळीस पिढया नरकात जाण्याची तसेच वाळीत टाकण्याची भिती घातली. त्यामुळे वडिलांनी जोतिरावांना शाळा बंद करण्याचा, नाही तर घर सोडण्याचा निर्वाणीचा इशारा दिला. त्यामुळे जोतिरावांना आपल्या वडिलोपार्जित घराला मुकावे लागले.

**९) आर्थिक अडचण :**

महात्मा जोतिराव फुलेंना आपल्या वडिलोपार्जित घराबरोबर वडिलांकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यास मुकावे लागले. त्यामुळे शाळा चालविण्यास त्यांना पैशाची गरज भासू लागली. परंतु आर्थिक विवंचनेत असताना मात्र इतरांकडून वेळप्रसंगी मदत झाली.

अशाप्रकारे महात्मा फुलेंनी स्त्री उध्दाराची कार्ये करत असताना अनेक समस्यांना व विरोधांना सामोरे जावे लागले. परंतु या समस्यांना व विरोधांना न जुमानता स्त्री व बहुजन उध्दाराच्या कार्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

## सारांश व निष्कर्ष :

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेमुळे समाजात धार्मिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विषमता निर्माण होऊन तथाकथित उच्चवर्णियांकडून धर्माच्या नावाखाली अस्पृश्य, दीनदलित, स्त्रिया यांची शरीरिक, मानसिक, आर्थिक पिळवणूक होत असे.

परंतु 'यदा यदा ही धर्मस्य......' या गीतेतील उक्तीप्रमाणे बहुजनांच्यावर होत असलेल्या अन्यायाला, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी, त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी एक महापुरूष अवतरला तो म्हणजे महात्मा जोतिराव फुले होय. त्यांनी बहुजनांची आणि स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी, त्यांना आपल्या स्वाभिमानाची, मानवी हक्काची जाणीव करून देण्यासाठी व सामाजिक न्याय, समता, बंधुभाव, बुध्दीप्रामाण्य इ. तत्वांवर समाजाची उभारणी करण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर लढा दिला.

महात्मा जोतिराव फुले यांच्या सामाजिक कार्यातील अत्यंत महत्वाचा पैलू म्हणजे 'स्त्री-शिक्षणाला चालना होय', ते फक्त वाचावीर नव्हते तर क्रांतीवीर होते. पारंपारिक चालीरीती, रूढी व परंपरा यांच्या भिंती छेदून त्यांनी पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा काढली आणि आपल्या समाजपरिवर्तनाच्या व स्त्री-उध्दाराच्या कार्याला सुरूवात केली. आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण देऊन शाळेत शिक्षिकेचे काम करण्यास तयार केले. भारतीय समाजातील स्त्रियांची बालविवाह, पडदा पध्दती, बहुपत्नित्व, स्त्रियांची बालहत्या, आजन्म वैधव्य, केशवपन, शिक्षण बंदी यासारख्या एकापेक्षा एक अशा अमानुष प्रथांनी गुलामाहुनही वाईट बनलेली होती. यामुळे स्त्रियांची स्त्री-दास्यातून मुक्तता करण्यासाठी त्यांनी स्त्री-शिक्षणाला चालना दिली, बालविवाह, बहुपत्नित्वास विरोध केला, विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले, बालहत्या प्रतिबंधकगृह आणि सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अशाप्रकारे त्यांनी बहुजन व स्त्री-उध्दारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

समाज परिवर्तने ही योगायोगाने घडून येत नसतात तर ती करारी नि क्रांतीकारी लोकांच्या निर्धारातून उगम पावत असतात. स्त्री-शिक्षणासारख्या पवित्र कार्यास चोहोंकडून विरोध होत असताना देखील ते आपल्या समाज परिवर्तनाच्या कार्यापासून यत्किंचितही ढळले नाहीत. भारतीय स्त्रियांना त्यांचे हक्क, स्वातंत्र्य, स्वाभिमान याची जाणीव करून देणाऱ्या, अनिष्ट चालीरीती, रूढी-परंपरा यांच्यावर हल्ला चढवणाऱ्या, स्त्रियांच्या दैन्याला वाचा फोडणाऱ्या आणि जातीभेद, विषमता यावर आधारलेल्या अभेद्य समाजव्यवस्थेच्या बुरूजाला धक्का लावणाऱ्या महात्मा जोतिराव फुले यांना क्रांतीकारकच म्हटले पाहिजे.

अशाप्रकारे भारतीय स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी, त्यांच्या अंधारलेल्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी व एकूणच त्यांच्या कल्याणासाठी आणि उध्दारासाठी जुन्या, पारंपारिक चालीरितींना छेद देऊन प्रथमच स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून देणारे 'महात्मा जोतिराव फुले' हे भारतीय स्त्री-शिक्षणातील एक *'आद्यक्रांतीकारकच'* होत.

## संदर्भ ग्रंथसूची :


१) कीर, ध. (१९७३). 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२) जोशी, द. बा. (१९८७). 'महात्मा जोतीबा फुले', सुरेश एजन्सी, पुणे.
३) मगर, नि. (१९९१). 'जोतिराव फुल्यांची समाजपरिवर्तन नीती', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद.
४) गुंदेकर, श्री. (१९९२). 'महात्मा जोतीबा फुले : विचार आणि वाङ्मय', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
५) ठाकूर, र. (१९९९). 'महात्मा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
६) नागोरी, एस. एल. व नागोरी, के. (१९९९). 'भारत के महापुरूष और उनके विचार', सबलाईम पब्लिकेशन्स ट्रस्ट, जयपूर.
७) भगत, रा. तु. (२००१). 'शिक्षणातील थोर विचारवंत', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
८) कुंडले, म. बा.(२००३). 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', श्रीविद्या प्रकाशन, मुंबई.
९) कीर, ध., मानशे, सं. गं. व फडके य. दि. (संपा.२००६). 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
१०) महाराष्ट्रातील नामवंत शिक्षण तज्ञ (२००७). 'शिक्षण विचार', शिक्षण मंडळ, कराड.
११) खोब्रागडे, ह. व गारोडे, प्र. (२००८). 'महात्मा फुल्यांचे विचार', देवयानी प्रकाशन, नवी मुंबई.

१२) कऱ्हाडे, बी. एम. (२०११). 'शास्त्रीय संशोधन पध्दती', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
१३) पाटील, पी. एस. (२०१२). 'महात्मा जोतिराव फुले', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे.



**सचिन बजरंग जाधव**
**संशोधक विद्यार्थी , भूगोल विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**